# <u>विशेष खटला क्र.१२२/२०२५ मधील नि.क्र.१६ वरील आदेश</u>

(CNR NO.MHPU14-001422-2025)

(पारीत दिनांक – २३.०२.२०२६)

१. अर्ज व त्यावरील विद्वान सरकारी अभियोक्ता व आरोपीचे म्हणणे वाचले.

२. बचाव पक्ष व आरोपीच्या विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला.

३. फिर्यादी यांनी प्रस्तुत प्रकरणाचे कामकाज व्हीडीओ रेकॉर्डींग द्वारे करण्यात यावे याबाबत ते मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका दाखल करणार असल्याचे कथन करुन सदर याचिका निकाली निघेपावेतो प्रस्तुत प्रकरणातील संपूर्ण कामकाज स्थगित करण्यात यावे अथवा प्रस्तुत प्रकरणाचे कामकाज पुढे ढकलण्यात यावे अशी विनंती केली.

४. उपरोक्त नमूद विनंतीस आरोपीच्या विद्वान वकिलांनी विरोध करुन फिर्यादी हे प्रत्येक तारखेस वेगवेगळे अनेक अर्ज दाखल करुन जाणीवपूर्वक प्रकरणाची कार्यवाही पुढे ढकलत असल्याचे कथन केले. तसेच त्यांनी प्रस्तुत प्रकरणात आरोपीचा जामीन अर्ज प्रलंबित ठेवण्याकरीता फिर्यादी प्रयत्न करीत असल्याचे कथन केले. सबब प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती आरोपीच्या विद्वान वकिलांनी केली.

५. **डॉ.हेमा आहुजा विरुध्द महाराष्ट्र सरकार, २०२४; बीएचसी–एएस; १२१३५** या अधिनिर्णयात मा.उच्च न्यायालयाने शासनास अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा, १९८९ मधील कार्यवाहीचे व्हीडीओ रेकॉर्डींग करणेबाबत सोय करण्यासाठी महाराष्ट्र शासनास आदेश केला आहे. मात्र त्याचसोबत जोपावेतो सदर व्हीडीओ रेकॉर्डींग सोय पुरविण्यात येत नाही तोपावेतो सदर प्रकरणातील कामकाज व्हीडीओ रेकॉर्डींग

केल्याशिवाय पुढे चालविण्यात यावे असेही स्पष्ट निर्देश दिलेले आहेत. अशा परिस्थितीत, केवळ  व्हीडीओ रेकॉर्डींगचे निमित्त पुढे करुन फिर्यादी जाणीवपूर्वक प्रकरणाचे कामकाज पुढे ढकलण्याचा प्रयत्न करीत असल्याचे त्यांनी आतापर्यंत दाखल केलेल्या सर्व अर्जावरुन स्पष्टपणे दिसून येते. त्यामुळे आरोपीचा जामीन अर्ज प्रलंबित असल्याचे दिसून येत आहे.

६. **सतेंदरकुमार अंटील विरुध्द सी.बी.आय व इतर, एआयआर २०२२ एससी ३३८६** या न्याय निर्णयातील आदेशाप्रमाणे जामीनचा अर्ज विहीत मुदतीत निकाली काढणे आवश्यक असल्याने प्रकरणातील कारवाई अनिश्चित कालावधीकरता तहकूब करणे न्यायोचित होणार नाही. या ठिकाणी हे विशेषरित्या नमूद करणे आवश्यक वाटते की, प्रस्तुत प्रकरणातील अर्ज नि.१४ यावर प्रस्तुत प्रकरणातील कामकाज न्यायालयातील उपलब्ध व्हीडीओ कॉन्फरन्सींग सुविधेद्वारे रेकॉर्ड करण्याचा आदेश यापूर्वीच पारीत करण्यात आला आहे. आजरोजी अचानकपणे संपूर्ण न्यायालयातील इंटरनेट सुविधा बंद पडल्याने सदर व्हीडीओ रेकॉर्डींग करता येवू शकत नाही. मात्र उपरोक्त नमूद मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशाचे पालन करुन प्रस्तुत प्रकरण पुढे चालविणे आवश्यक ठरते. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

अर्ज – नि.१६ हा नामंजूर करण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by HETENDRA ANILKUMAR WANI
Date: 2026.02.24 13:27:12 +0530

(**हितेंद्र उर्मिला अनिलकुमार वाणी**)

दिनांक – २३.०२.२०२६

अतिरिक्त सत्र न्यायाधीश, बारामती.